इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

**मुंबई उच्च न्यायालयात**

**साधारण मूळ दिवाणी अधिकार क्षेत्र**

**रिट याचिका क्र. १३१२/२०१२**
**सोबत**
**चेंबर समन्स क्र. ९९/२०१२**
**मध्ये**
**रिट याचिका क्र. १३१२/२०१२**
**सोबत**
**नोटीस ऑफ मोशन क्र. २७७/२०१६**
**मध्ये**
**रिट याचिका क्र. १३१२/२०१२**

मोहन धोत्रे
भारतीय रहिवासी, यांचा पत्ता –
राहणार फ्लॅट क्र. १४०२, चॅलेंजर क्र. २,
ठाकूर व्हिलेज, ठाकूर सिनेमा जवळ,
कांदिवली (पूर्व) मुंबई ४००१०१ ... याचिकाकर्ता

विरुद्ध

१. महाराष्ट्र राज्य व इतर
उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागामार्फत,
मंत्रालय, मुंबई – ३२

२. प्रधान सचिव,
कामगार विभाग, मंत्रालय,
मुंबई – ३२

३. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
हुतात्मा बाबू गेनू
मुंबई गिरणी कामगार क्रीडा केंद्र,
सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन, मुंबई – १३ ... उत्तरवादी

-----------

वकील श्री. पी. के. ढाकेफळकर, वरिष्ठ वकील, सोबत विशाल घोसाळकर, वैभव जागदळे, पांडुरंग अंधक, शुभम धोबळे याचिकाकर्त्यांसाठी.

वकील श्री. हिमांशू टक्के, एजीपी उत्तरवादी राज्यासाठी.

वकील श्री. श्रिशैल देशमुख उत्तरवादी क्र. ३ – मंडळासाठी.

-----------

**न्यायमंच : न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी आणि**
**न्यायमूर्ती आरती साठे.**

**राखीव दिनांक : १० ऑक्टोबर २०२५**

**घोषित दिनांक : १७ ऑक्टोबर २०२५**

**न्यायनिर्णय (न्यायमूर्ती आरती साठे यांच्याद्वारे):-**

१. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत ही रिट याचिका दाखल करण्यात आली आहे, ज्यात उत्तरवादी क्र. २ यांचा दिनांक ३१ जानेवारी २०१२ चा निर्णय आव्हानित करण्यात आला आहे, ज्याद्वारे याचिकाकर्त्यास उत्तरवादी क्र. ३-मंडळाच्या कल्याण आयुक्त पदावरून पदच्युत करण्यात आले. याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे की सदर वादग्रस्त आदेश कोणत्याही कायदेशीर अधिकाराशिवाय देण्यात आला असून, तो

उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या एका कर्मचाऱ्याने केलेल्या तक्रारीवर आधारित आहे. ही तक्रार उत्तरवादी क्र. ३ – मंडळाने स्थापन केलेल्या समितीच्या चौकशी अहवालात मान्य केल्यानुसार खोटी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

२. ही याचिका या न्यायालयाने दिनांक २८ फेब्रुवारी २०१२ रोजीच्या आदेशाद्वारे दाखल केली असून, विनंती परिच्छेद (क) नुसार अंतरीम स्थगिती देण्यात आली होती. सदर आदेशाला आव्हान देण्यासाठी राज्याने विशेष अनुज्ञा याचिका (एस.एल.पी.) सिव्हिल क्र. १६०३८/२०१३ सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. दिनांक ५ जुलै २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने सदर विशेष अनुज्ञा याचिकेवर खालील आदेश पारित केला:-

> दोन्ही पक्षांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले.
>
> १. अनुज्ञा मंजूर करण्यात येते.
>
> २. अपीलकर्त्यांच्या वतीने विद्वान वकील श्री. शंकर चिल्लारगे यांचे संक्षिप्त म्हणणे असे आहे की, कारण उत्तरवादीला आधीच सेवेतून पदच्युत करण्यात आले होते आणि तोच आदेश उच्च न्यायालयात आव्हानासमोर होता, त्यामुळे उच्च न्यायालय त्याची याचिका ग्राह्य धरताना पदच्युती आदेशावर अंतरीम स्थगिती देऊ शकत नव्हते. दुसरीकडे, उत्तरवादींच्या वतीने हजर असलेले विद्वान वकील श्री. सुधांशु एस. चौधरी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्त्यांना त्यांचे युक्तिवाद मांडण्याची संधी देण्यासाठी त्या आदेशाला स्थगिती दिली जाऊ शकली असती.
>
> ३. आम्ही श्री. चौधरी यांनी मांडलेला युक्तिवाद स्वीकारू शकत नाही. पदच्युती आदेश कार्यान्वित झालेला असल्याने त्यास स्थगिती देता येत नाही. या प्रकरणाच्या गुणवत्तेवर आम्ही कोणतेही मत व्यक्त करीत नाही, जेणेकरून पहिला उत्तरवादी उच्च न्यायालयासमोर त्याचे युक्तिवाद मांडताना कोणत्याही प्रकारे पूर्वग्रहदूषित होणार नाही. उच्च न्यायालयाने त्याची याचिका दाखल करून घेतली आहे आणि ते स्वतःच्या गुणवत्तेच्या आधारे या प्रकरणाचा निर्णय घेईल. उत्तरवादी यांना उच्च न्यायालयाकडे आवश्यक त्या दिलासासाठी अर्ज करण्याचे स्वातंत्र्य असेल . श्री. चौधरी यांनी सांगितले की त्यांनी स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज केला आहे. तसे असल्यास, ते त्याबाबत आपले युक्तिवाद सादर करू शकतात आणि उच्च न्यायालय त्यावर विचार करेल.
>
> ४. सद्यस्थितीत, उच्च न्यायालयाने विनंती परिच्छेद 'क' नुसार दिलेली अंतरीम स्थगिती रद्द करण्यात येईल. पदच्युती आदेशाची कार्यवाही लागू राहील.

५. अपील याच अटींवर मंजूर करण्यात येते.

६. श्री. चौधरी अशी विनंती करतात की उच्च न्यायालयाच्या संबंधित खंडपीठाने हे अपील लवकर सुनावणीसाठी घ्यावे. उच्च न्यायालय त्या विनंतीचा विचार करेल.

३. वरील आदेशाच्या पार्श्वभूमीवर, या न्यायालयाने दिलेली अंतरीम स्थगिती दिनांक ५ जुलै २०१३ रोजी रद्द झाली. सध्याची याचिका निकाली काढणीसाठी आवश्यक असलेली थोडक्यात तथ्ये पुढीलप्रमाणे आहेत:-

३.१ याचिकाकर्ता, उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या सेवेत सन १९९२ मध्ये रुजू झाला आणि दिनांक १४ मे १९९२ रोजी नियुक्तीपत्रातील अटी व शर्तीनुसार वरिष्ठ उपकल्याण आयुक्त या पदावर त्याची नियुक्ती करण्यात आली. उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या सेवेत दाखल होण्यापूर्वी याचिकाकर्ता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) येथे कामगार अधिकारी म्हणून दिनांक १५ नोव्हेंबर १९८३ ते ०४ जुलै १९९२ या कालावधीत कार्यरत होता. उत्तरवादी क्र. ३ – मंडळाने प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीच्या आधारे याचिकाकर्त्याने वरिष्ठ उपकल्याण आयुक्त पदासाठी अर्ज केला होता आणि जाहिरातीमध्ये नमूद पात्रतेच्या अटींनुसार याचिकाकर्ता त्या पदासाठी पात्र ठरल्याने दिनांक १४ मे १९९२ रोजी त्याची नियुक्ती करण्यात आली.

३.२. सन १९९९ मध्ये कल्याण आयुक्त हे पद रिक्त होणार होते, कारण तेव्हाचे कल्याण आयुक्त सेवानिवृत्तीला पात्र ठरत होते. याचिकाकर्त्याचा दावा असा आहे की, बॉम्बे लेबर वेल्फेअर नियम, १९५३ (यापुढे ‘सदर नियम’ असे संबोधले जाईल) मधील नियम

१८अ (१)(ब) नुसार त्याला कल्याण आयुक्त पदावर बढती मिळण्याचा हक्क होता. याचिकाकर्त्याच्या कार्यक्षमताचा विचार करून, दिनांक २७ ऑगस्ट १९९९ रोजी त्यास कल्याण आयुक्त पदावर बढती देण्यात आली. हे नमूद करणे महत्त्वाचे आहे की, बॉम्बे वेल्फेअर लेबर फंड अधिनियम, १९५३ (यापुढे 'सदर अधिनियम' / 'सदर कायदा' असे संबोधले जाईल) च्या कलम ११ नुसार कल्याण आयुक्ताची नियुक्ती करण्याचा अधिकार उत्तरवादी क्र. ३ – मंडळाकडे असून त्यासाठी उत्तरवादी क्र. १ यांची पूर्वमान्यता आवश्यक आहे. उत्तरवादी क्र. ३ – मंडळाने उत्तरवादी क्र. १ यांची पूर्वमान्यता घेऊन याचिकाकर्त्याची कल्याण आयुक्त पदावर नियुक्ती केली.

३.३ सन २०००–२००१ च्या सुमारास "टाइम्स ऑफ इंडिया" या वृत्तपत्रात एक बातमी प्रसिद्ध झाली होती, ज्यामध्ये असे नमूद करण्यात आले होते की उत्तरवादी क्र. ३ – मंडळाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या पगारावर केलेला खर्च हा एकूण उत्पन्नाच्या ९५% पेक्षा जास्त आहे. याचिकाकर्त्याच्या मते ही माहिती चुकीची होती. सदर बातमीच्या अनुषंगाने उत्तरवादी क्र. १ यांनी या प्रकरणाची चौकशी जाहीर केली आणि कोणतेही कारण न देता याचिकाकर्त्यास रजेवर जाण्याचे निर्देश दिले. त्यानुसार याचिकाकर्ता रजेवर गेला. या पार्श्वभूमीवर उत्तरवादी क्र. १ यांनी उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी एका उपसचिवांची नियुक्ती केली. याचिकाकर्त्याविरुद्ध चार्जशीट्स इत्यादी दाखल करून त्याची बजावणी करण्यात आली तसेच या विषयावर निर्णय घेण्यासाठी

पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली. याचिकाकर्त्याने प्राथमिक हरकती म्हणून असा युक्तिवाद मांडला की, उत्तरवादी क्र. १ यांना उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या बाबतीत याचिकाकर्त्याविरुद्ध वरीलप्रमाणे चौकशी करण्याचा अधिकार नाही, कारण याचिकाकर्ता हा उत्तरवादी क्र. १ यांचा कर्मचारी नसून उत्तरवादी क्र. ३ – मंडळाचा कर्मचारी आहे. उत्तरवादी क्र. १ यांनी याचिकाकर्त्याचा हा युक्तिवाद मान्य केला. परिणामी, याचिकाकर्त्यास जारी केलेल्या चार्जशीटसह प्रस्तावित चौकशी रद्द करण्यात आली.

३.४ सन २००० च्या सुमारास उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या कार्यालयात निधी निरीक्षक या पदांसाठी रिक्त जागा होत्या. त्या भरावयासाठी उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या अध्यक्षतेखाली निवड समितीची स्थापना करण्यात आली.

३.५ सदर निवड समितीने लेखी परीक्षा घेतली. उत्तरवादी क्र. ३ – मंडळातील एका महिला कर्मचाऱ्याने (यापुढे 'एक्स' असा उल्लेख केला जाईल) सदर परीक्षेला हजेरी लावली, परंतु निवड समितीने तिची निवड केली नाही. त्यानंतर 'एक्स' ने स्वतःची निवड निधी निरीक्षक या पदावर व्हावी यासाठी याचिकाकर्ता आणि संबंधित अधिकाऱ्यांवर दबाव आणण्यास सुरुवात केली. 'एक्स' ने त्यावेळच्या मेहरबान उपमुख्यमंत्री यांच्याकडेही निवड न झाल्याबाबत तक्रार केली. त्या वेळी मेहरबान उपमुख्यमंत्री यांनी या विषयावर याचिकाकर्त्याकडे चौकशी केली असता, याचिकाकर्त्याने त्यांना कळविले

की निवड समितीला श्रीमती. म्हात्रे या सदर पदासाठी योग्य उमेदवार वाटल्या नाहीत, त्यामुळे त्यांची निधी निरीक्षक पदावर नियुक्ती करण्यात आलेली नाही. याचिकाकर्त्याचा दावा असा आहे की श्रीमती. म्हात्रे यांनी आपल्या निवडीस नकार मिळण्यास याचिकाकर्ताच जबाबदार असल्याचे गृहीत धरले.

३.६. दिनांक २१ नोव्हेंबर २००२ रोजी, जेव्हा 'एक्स' आणि उत्तरवादी मंडळाचे इतर कर्मचारी सर्व्हर रूममध्ये बसले होते, तेव्हा याचिकाकर्त्याने सर्व्हर रूमला भेट दिली होती. असा आरोप आहे की याचिकाकर्त्याने सर्व्हर रूममध्ये बसलेल्या सर्वांना त्वरित बाहेर जाण्याचे सांगितले आणि केवळ सर्व्हर रूमसाठी जबाबदार असलेली व्यक्तीच त्या खोलीत राहण्यास परवानगी दिली, इतर सर्वांना आपापल्या टेबलावर परत जाण्याचे निर्देश दिले. असे नमूद केले आहे की, याचिकाकर्त्याने सर्व्हर रूममधील माहितीची गोपनीयता आणि सदर रूममध्ये खूप जास्त लोकांची उपस्थिती अनावश्यक असल्यामुळे उपरोक्त सूचना दिल्या. याचिकाकर्त्यामुळे आपली पदोन्नती झाली नाही या संशयामुळे नाराज असलेल्या 'एक्स' ने, दिनांक २८ नोव्हेंबर २००२ रोजी दादर पोलीस ठाण्यात याचिकाकर्त्याविरुद्ध आयपीसी १८६० च्या कलम ३५४, ५०४ आणि ५०९ अंतर्गत तक्रार दाखल केली. तिने आरोप केला की याचिकाकर्त्याने तिच्या कामाच्या ठिकाणी तिचा लैंगिक छळ केला होता. दिनांक २६ डिसेंबर २००२ रोजी, याचिकाकर्त्याचा नियोक्ता असलेल्या उत्तरवादी क्र. ३- मंडळाने 'एक्स' ने केलेल्या तक्रारीवर याचिकाकर्त्याविरुद्ध

चौकशी सुरू केली. चौकशीअंती असे निष्कर्ष काढण्यात आले की 'एक्स' ची तक्रार कोणत्याही तथ्यावर आधारित नव्हती आणि ती याचिकाकर्त्याविरुद्ध वैयक्तिक वैरातून करण्यात आली होती.

३.७ या पार्श्वभूमीवर, 'एक्स' ने उत्तरवादी क्र. २ यांच्याकडे अशाच प्रकारची तक्रार दाखल केली आणि त्या तक्रारीच्या आधारे उत्तरवादी क्र. २ यांनी उपसचिव श्रीमती बीना प्रभू व उपकामगार आयुक्त श्रीमती काट्टी यांची या विषयाची चौकशी करण्यासाठी नियुक्ती केली. सदर चौकशीत 'एक्स' यांनी केलेल्या आरोपांबाबत याचिकाकर्ता दोषी आढळला नाही. अशा परिस्थितीत 'एक्स' यांनी अशाच प्रकारची तक्रार महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे केली आणि सन २००३ च्या सुमारास, उत्तरवादी क्र. १ यांच्या उपसचिवांनी याचिकाकर्त्याला 'एक्स' यांनी केलेल्या तक्रारीच्या विषयावर एकूण सात आरोप निश्चित करून चार्जशीट जारी केली.

३.८ चार्जशीटच्या उत्तरादाखल, याचिकाकर्त्याने दिनांक २५ नोव्हेंबर २००३ रोजी उत्तर दाखल करून सर्व आरोप नाकारले, तसेच प्राथमिक हरकत म्हणून असा युक्तिवाद मांडला की उत्तरवादी क्र. १ यांना चौकशी सुरू करण्याचे अधिकारक्षेत्र व अधिकार नाहीत, कारण मंडळ हेच नियुक्ती प्राधिकरण आहे. दिनांक १५ डिसेंबर २००३ रोजी, उत्तरवादी क्र. १ च्या निर्देशानुसार, उत्तरवादी क्र. ३- मंडळाच्या तत्कालीन अध्यक्षांनी

दिनांक १५ डिसेंबर २००३ च्या आदेशाद्वारे याचिकाकर्त्याची सेवा निलंबित करण्याचा आदेश जारी केला.

३.९ अशा परिस्थितीत याचिकाकर्त्याने या न्यायालयात रिट याचिका क्र. ७५६२/२००३ दाखल करून उत्तरवादी क्र. १ व २ यांना त्याच्याविरुद्ध चौकशी करण्याचा अधिकार नसल्याचे आव्हान दिले. दरम्यान, ‘एक्स’ ला तिची चूक लक्षात आल्यानंतर तिने संबंधित अधिकाऱ्यांकडे अशी विनंती करण्यास सुरुवात केली की तिची उच्च पदावर पदोन्नती याचिकाकर्त्यामुळे झाली नाही असे नाही आणि तिच्या पदोन्नती न होण्यास याचिकाकर्ता जबाबदार नव्हता. प्रत्यक्षात ‘एक्स’ ने कबूल केले की, ती याचिकाकर्ताच तिच्या पदोन्नती न होण्यास जबाबदार आहे या चुकीच्या समजुतीखाली होती आणि या गैरसमजुतीतूनच तिने मानसिक तणावाखाली असताना याचिकाकर्त्याविरुद्ध ती तक्रार दाखल केली होती. “एक्स’ ने दिनांक १७ जानेवारी २००४ रोजी महाराष्ट्र राज्य कामगार मंत्रालयाचे प्रधान सचिव यांच्यासमोर प्रतिज्ञापत्र सादर करून असा स्पष्ट उल्लेख केला की तिने याचिकाकर्त्यावर कथित लैंगिक छळाचा जो आरोप केला होता, तो चुकीचा असून असा कोणताही प्रकार घडलेला नाही. त्यामुळे तिने याचिकाकर्त्याविरुद्ध दाखल केलेली तक्रार मागे घेतली. तिने हीच भूमिका याचिकाकर्त्याविरुद्ध दाखल केलेल्या फौजदारी खटल्यातही घेतली आणि तिच्या जबाबाच्या आधारे विद्वान अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, भोईवाडा यांनी दिनांक १० जानेवारी २००४ रोजी आदेश पारित

करून 'एक्स' यांनी दाखल केलेल्या फौजदारी खटला क्र. ६१/पी/२००३ मध्ये याचिकाकर्त्याची निर्दोष मुक्तता केली.

३.१० दरम्यान, याचिकाकर्त्याने दाखल केलेली रिट याचिका क्र. ७५६२/२००३ या न्यायालयात स्वीकृतीसाठी आली. दिनांक २३ फेब्रुवारी २००४ रोजी या न्यायालयाने याचिकाकर्त्याविरुद्ध चौकशी करण्याचा उत्तरवादी क्र. १ व २ यांचा अधिकार या मुद्द्यावर ही याचिका दाखल करून घेतली. मात्र न्यायालयाने चौकशी सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आणि पुढे असेही निर्देश दिले की सदर चौकशीत कोणताही प्रतिकूल आदेश पारित झाल्यास, तो आदेश चौकशी संपल्यानंतर चार आठवड्यांच्या कालावधीपर्यंत अंमलात आणला जाणार नाही. याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे की सदर रिट याचिका दाखल केली जात असताना 'एक्स' यांनी दिलेल्या जबाबाच्या आधारे याचिकाकर्त्याविरुद्ध दाखल फौजदारी खटला मागे घेण्यात आला होता आणि याचिकाकर्त्याची निर्दोष मुक्तता झाली होती हे न्यायालयाच्या निदर्शनास आणले गेले नव्हते.

३.११ 'एक्स' यांनी आपली तक्रार मागे घेतली होती आणि याचिकाकर्त्याची फौजदारी कार्यवाहीत निर्दोष मुक्तता झाली होती, हे लक्षात घेऊन उत्तरवादी क्र. ३ – मंडळाचे त्या वेळचे अध्यक्ष यांनी दिनांक १ जून २००४ रोजी आदेश पारित करून याचिकाकर्त्यावरील निलंबन आदेश मागे घेतला आणि त्यांना पुन्हा सेवेत रुजू होण्याची परवानगी दिली.

३.१२ या न्यायालयाने दिनांक २३ फेब्रुवारी २००४ रोजी याचिकाकर्त्याविरुद्ध चौकशी चालविण्यास परवानगी देणारा आदेश पारित केल्यामुळे, याचिकाकर्त्याविरुद्ध चौकशी सुरू ठेवण्यात आली आणि त्या चौकशीचा एक भाग म्हणून 'एक्स' यांची दिनांक १ जुलै २००४ रोजी साक्ष नोंदविण्यात आली. चौकशीदरम्यान याचिकाकर्त्याने आपले प्रतिवादपत्रही सादर केले. 'एक्स' यांच्या साक्षीवर आणि याचिकाकर्त्याच्या प्रतिवादपत्रावर आधारित, चौकशी अधिकाऱ्याने दिनांक ५ जून २००६ रोजी आपला अहवाल सादर केला. चौकशी अहवालाच्या उत्तरादाखल याचिकाकर्त्याने दिनांक १४ नोव्हेंबर २००७ रोजी आपले म्हणणे सादर करताना स्पष्टपणे नमूद केले की उत्तरवादी क्र. १ यांना याचिकाकर्त्याविरुद्ध चौकशी सुरू करण्याचा अधिकार नाही आणि सदर चौकशी सुरू करण्याच्या उत्तरवादी क्र. १ च्या अधिकारक्षेत्रावर कोणताही पूर्वग्रह न ठेवता उपरोक्त लेखी जबाब सादर केला.

३.१३ दिनांक २५ जानेवारी २००८ रोजी, याचिकाकर्ता आणि 'एक्स' यांनी केलेल्या सादरीकरणासह चौकशी अधिकाऱ्याच्या अहवालाचा विचार करून, उपसचिवांनी याचिकाकर्त्याविरुद्ध 'एक्स' यांच्या तक्रारीशी संबंधित नैतिक अध :पतनाच्या आरोपांबाबतचे आरोप रद्द करण्याचे निर्देश दिले. उपसचिवांच्या सदर आदेशानुसार, जरी याचिकाकर्ता नैतिक अध:पतनाच्या आरोपांमध्ये निर्दोष ठरला, तरीही 'एक्स' च्या बदलीसंबंधी व तिला दिलेल्या रजेच्या मंजुरीसंबंधी आरोप क्रमांक ४, ५ आणि ६ मध्ये

याचिकाकर्त्यास जबाबदार धरले गेले. राज्याने देखील ‘एक्स’ यांनी केलेल्या लैंगिक छळाच्या आरोपांवर नव्हे तर याचिकाकर्त्याविरुद्ध सिद्ध ठरलेल्या इतर आरोपांच्या पार्श्वभूमीवर, याचिकाकर्त्याचे दोन वेतनवाढीचे हप्ते दोन वर्षांसाठी थांबवण्याचा निर्णय घेतला.

३.१४ उपरोक्त दिनांक २५ जानेवारी २००८ च्या आदेशाच्या अनुषंगाने, याचिकाकर्त्यास कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली, ज्यात त्यांना विचारले होते की याचिकाकर्त्याचे दोन वेतनवाढीचे हप्ते का थांबवू नयेत. याचिकाकर्त्याने सदर कारणे दाखवा नोटीसीस उत्तर देताना पुन्हा एकदा प्राथमिक हरकत घेतली की उत्तरवादी क्र. १ यांना त्याच्याविरुद्ध कोणतीही चौकशी करण्याचा अधिकार नाही.

३.१५ चौकशी अहवालात याचिकाकर्त्यावरील आरोप रद्द करण्यात आले होते, तसेच ‘एक्स’ यांनी तक्रार मागे घेतली होती आणि याचिकाकर्त्याविरुद्ध इतर सर्व आरोपही रद्द झाले होते, या पार्श्वभूमीवर याचिकाकर्त्याने या न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र. ७५६२/२००३ मागे घेतली. दरम्यान, आणखी एक जनहित याचिका क्र. १९८/२००९ या न्यायालयात दाखल करण्यात आली, ज्यामध्ये पुन्हा एकदा ‘एक्स’ च्या लैंगिक छळाच्या मुद्द्याचा उल्लेख करण्यात आला; मात्र याचिकाकर्त्याने अचूक तथ्ये नोंदविल्यानंतर सदर जनहित याचिका निकाली काढण्यात आली.

३.१६ उत्तरवादी क्र. ३ – मंडळाने याचिकाकर्त्यावरील निलंबन आदेश मागे घेणारे आदेश पारित केले होते आणि ‘एक्स’ यांनी केलेले लैंगिक छळाचे आरोपही रद्द करण्यात आले होते, तरीदेखील याचिकाकर्त्यावर उत्तरवादी क्र. २ म्हणजेच महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव यांनी दिनांक ३१ जानेवारी २०१२ रोजी पारित केलेल्या वादग्रस्त आदेशाची प्रत बजावण्यात आली, ज्यामध्ये ‘एक्स’ यांनी केलेल्या तक्रारीच्या व त्या अनुषंगाने पार पडलेल्या चौकशीच्या आधारे याचिकाकर्त्यास, उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले.

३.१७ दिनांक १ मार्च २०१३ रोजी याचिकाकर्त्याने, उत्तरवादी क्र. ३ – मंडळाचे अध्यक्ष यांच्याकडे अर्ज सादर करून स्वेच्छानिवृत्तीची मागणी केली. याचिकाकर्त्याचा स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज उत्तरवादी क्र. ३ – मंडळाने दिनांक २ मे २०१३ रोजी मंजूर केला आणि दिनांक ३१ मे २०१३ पासून याचिकाकर्त्यास उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या सेवेतून मुक्त करण्यात आले.

३.१८ त्यानंतर, याचिकाकर्त्याने सुमारे सन २०१६ मध्ये या न्यायालयात नोटीस ऑफ मोशन क्र. २७७/२०१६ दाखल केली, ज्यामध्ये सध्याची याचिका प्रलंबित असताना निवृत्तीनंतरची त्यांची देयक मिळवून देण्याची विनंती करण्यात आली. सदर नोटीस ऑफ मोशन या न्यायालयाने दिनांक २६ एप्रिल २०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाद्वारे निकाली काढली, ज्याचा मजकूर पुढीलप्रमाणे आहे:-

"पी.सी.:

१. सदर नोटीस ऑफ मोशन दाखल करून याचिकाकर्ता, जो बडतर्फ कर्मचारी आहे, त्याने घोषणा मागितली की उत्तरवादींना निर्देश द्यावेत की त्यांनी याचिकाकर्त्याला रजेचा पगार, ग्रॅज्युटी आणि पेन्शन या स्वरूपातील थकबाकी रक्कम अदा करावी. विद्वान वकील श्री. घोसाळकर यांच्या मते, ही नोटीस ऑफ मोशन दिनांक ५ जुलै २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका (सी) क्र. १६०३८/२०१३ मध्ये दिलेल्या स्वातंत्र्यानुसार दाखल करण्यात आली आहे. ते युक्तिवादाच्या समर्थनार्थ सर्वोच्च न्यायालयाचा युनियन ऑफ इंडिया आणि इतर विरुद्ध सी. जी. अजय बाबू आणि इतर. (२०१८) ९ एससीसी ५२९ या प्रकरणातील निर्णयावर अवलंबून राहिले, ज्यामध्ये असे नमूद केले आहे की सेवेतून बडतर्फी झाल्यानंतरही याचिकाकर्त्यास ग्रॅज्युटीचा हक्क आहे."

२. यावर वाद नाही की याचिकाकर्त्याची सेवा त्याच्या नोकरीदरम्यान झालेल्या नैतिक अध:पतनाच्या कारणावरून समाप्त करण्यात आली आहे. जोपर्यंत न्यायालय ही पदच्युती अवैध ठरवत नाही, तोपर्यंत ग्रॅज्युटी देण्यासंबंधी कोणताही निर्देश देण्याचा प्रश्नच येत नाही.

३. इतर देयकांच्या बाबतीतही, त्याबाबतचा निर्णय ही रिट याचिका अंतिमरीत्या निकाली निघाल्यानंतरच घेण्यात येईल.

४. त्यानुसार, आम्ही ही नोटीस ऑफ मोशन फेटाळतो.

५. तथापि, ही रिट याचिका जवळपास दहा वर्षांपासून या न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे, आम्ही या याचिकेला सुनावणीस अग्रक्रम देण्याचा मानस व्यक्त करतो. रिट याचिका अंतिम सुनावणीसाठी ८ जुलै २०२२ रोजी (बोर्डवर उच्च क्रमांकाने) निश्चित करण्यात येईल."

४ वरील पार्श्वभूमीवर, या न्यायालयासमोरील सध्याच्या कार्यवाहीमध्ये विचाराधीन असलेला मुद्दा असा आहे की उत्तरवादी क्र. १ यांना याचिकाकर्त्याला, उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्याचे व दिनांक ३१ जानेवारी २०१२ रोजीचा वादग्रस्त आदेश पारित करण्याचे अधिकारक्षेत्र होते का.

५ याचिकाकर्त्याच्या वतीने हजर असलेले विद्वान वरिष्ठ वकील श्री. ढाकेफळकर यांनी सादर केले की, वादग्रस्त आदेश उत्तरवादी क्र. १ यांनी कोणताही कायदेशीर अधिकार नसताना पारित केला आहे, कारण उत्तरवादी क्र. १ हे याचिकाकर्त्याचे नियोक्ता नाहीत आणि केवळ उत्तरवादी क्र. ३ – मंडळ हेच याचिकाकर्त्याचे नियोक्ता आहेत. म्हणून

त्यांनी सादर केले की, त्यामुळे कायद्यानुसार केवळ नियोक्त्यालाच संबंधित कर्मचाऱ्याला सेवेतून बडतर्फ करण्याचा अधिकार आहे आणि हा अधिकार नियोक्त्याशिवाय कोणालाही वापरता येत नाही. त्यांनी पुढे असेही नमूद केले की वादग्रस्त आदेश ज्यावर आधारित आहे तो पाया पूर्णपणे कोसळला आहे, कारण तक्रारदार 'एक्स' हिने स्वतःच इतर सहकर्मचाऱ्यांच्या प्रोत्साहनाने खोटी आणि बनावट तक्रार दाखल केल्याची कबुली दिली आहे.

६ उत्तरवादी क्र. १ म्हणजेच राज्य सरकारतर्फे दिनांक २८ फेब्रुवारी २०११ रोजी उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाचे उपसचिव श्री. बी. एस. वानखेडे यांनी सदर याचिकेत मागितलेल्या दिलास्याना विरोध करणारे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. या प्रतिज्ञापत्रातील पुढील मजकूर लक्षात घेणे आवश्यक आहे :-

> "२ सुरुवातीलाच मी असे नमूद करतो की सदर याचिका ही कायद्याच्या प्रक्रियेचा दुरुपयोग याचे उत्तम उदाहरण आहे. मी असे नमूद करतो की याचिकाकर्त्याला विभागीय चौकशीनंतर सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. मी असे नमूद करतो की उत्तरवादी क्र. ३ म्हणजेच महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ हे बॉम्बे लेबर वेल्फेअर ॲक्ट, १९५३ अंतर्गत स्थापन करण्यात आले आहे. या अधिनियमाची निर्मिती महाराष्ट्र राज्यातील कामगार कल्याण प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांच्या वित्तपुरवठ्यासाठी निधी निर्माण करण्यासाठी करण्यात आली आहे. मी असे नमूद करतो की अधिनियमातील विविध तरतुदींवरून राज्य सरकारचे मंडळाच्या कार्यावर एकूण नियंत्रण असल्याचे दिसते. सदर अधिनियमाच्या कलम ११ नुसार कल्याण आयुक्ताची नियुक्ती मंडळाने राज्य सरकारच्या पूर्वमान्यतेने करावयाची आहे. पुढे सदर कलमात नमूद आहे की कल्याण आयुक्त हा मंडळाचा प्रमुख कार्यकारी अधिकारी असेल. सदर अधिनियमाच्या कलम १४ नुसार मंडळाने राज्य सरकारच्या मान्यतेने (कल्याण आयुक्त व निरीक्षक वगळता) इतर कर्मचाऱ्यांच्या भरती पद्धती, वेतन व भत्ते आणि इतर सेवा अटींविषयी नियमावली तयार करावयाची आहे. कलम १५ पुढे तरतूद करते की, जी व्यक्ती मंडळाच्या सेवेसाठी अयोग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीला दूर करण्याचा अधिकार राज्य सरकारला असेल.

३ मी पुढे असे नमूद करतो की उत्तरवादी क्र. ३ मंडळाला प्रदान केलेल्या अधिकारांच्या आधारे, उत्तरवादी क्र. ३ – मंडळाने महाराष्ट्र लेबर वेल्फेअर बोर्ड एम्प्लॉईज (कंडीशन्स ऑफ सर्व्हिस) रुल्स, १९६१ या नावाने नियम तयार केले आहेत. नियम ५१-अ मध्ये असे नमूद आहे की "या नियमांमध्ये पूर्वी नमूद केलेल्या तरतुदींव्यतिरिक्त, बॉम्बे सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स (कलम ११ वगळता) वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा विचारात घेऊन कल्याण आयुक्त आणि मंडळातील इतर कर्मचाऱ्यांना लागू होतील." म्हणून मी असे नमूद करतो की बॉम्बे लेबर वेल्फेअर फंड ॲक्ट, १९५३ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले महाराष्ट्र लेबर वेल्फेअर बोर्ड एम्प्लॉईज (कंडीशन्स ऑफ सर्व्हिस) रुल्स, १९६१ यांच्या तरतुदी विचारात घेतल्यास नियम ५१-अ नुसार महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स कल्याण आयुक्ताच्या सेवांना लागू होतात हे स्पष्ट होते. मी पुढे नमूद करतो आणि सादर करतो की, अधिनियमातील कलम १५ चे अवलोकन केल्यास, हे स्पष्ट होते की राज्य शासनास अशी व्यक्ती अयोग्य आहे या निष्कर्षावर राज्य शासन पोहोचल्यास, उत्तरवादी क्र. ३ मंडळाच्या सेवेतून, कल्याण आयुक्तांना दूर करण्याचा अधिकार आहे.

४ मी असे नमूद करतो की संपूर्ण चौकशी कार्यवाही व चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल विचारात घेऊन, राज्य सरकाराने असा निष्कर्ष काढला की हे प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहे आणि संस्थांमध्ये/मंडळांमध्ये व इतर कार्यालयांमध्ये कार्यरत महिलांचा सन्मान टिकवून ठेवण्यासाठी याचिकाकर्त्याविरुद्ध बडतर्फीची कारवाई करणे आवश्यक आहे. मी असेही नमूद करतो की सरकारने या प्रकरणातील सर्व तथ्यांचा विचार करून याचिकाकर्त्याला सेवेतून बडतर्फ करण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे मी याचिकाकर्त्याचा हा युक्तिवाद फेटाळतो की दिनांक ३१.०१.२०१२ चा बडतर्फीचा आदेश कोणत्याही अधिकाराशिवाय आणि एका कर्मचाऱ्याच्या तक्रारीवर आधारित राहून पारित करण्यात आला होता, ज्याची तीन समित्यांनी चौकशी केली होती.

५ मी पुढे असे नमूद करतो की 'एक्स' ही उत्तरवादी क्र. ३ – मंडळामध्ये लिपिक म्हणून कार्यरत होती. मी असे नमूद करतो की सदर 'एक्स' हिने दिनांक १०.०१.२००३ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे तक्रार दाखल केली की याचिकाकर्ता वरिष्ठ उपकल्याण आयुक्त पदावर कार्यरत असताना तिचा लैंगिक छळ करीत होता. 'एक्स' यांनी केलेल्या तक्रारीची प्रत सदर प्रतिज्ञापत्रासोबत जोडलेली असून ती निशाणी "अ" म्हणून दर्शविण्यात आली आहे. मी असे नमूद करतो की सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन कायदा व न्याय विभागाच्या प्रधान सचिव व राज्य महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा सौ. प्रतिमा उमरजी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्यात आली. सौ. प्रतिमा उमरजी यांच्या अध्यक्षतेखालील सदर समितीने असा निष्कर्ष काढला की याचिकाकर्त्याविरुद्ध प्रथमदर्शनी प्रकरण आढळत आहे आणि त्यामुळे संबंधित विभागामार्फत विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे. सदर समितीने सादर केलेला अहवाल या प्रतिज्ञापत्रासोबत जोडलेला असून तो निशाणी "ब" म्हणून दर्शविण्यात आला आहे.

६ मी असे नमूद करतो की विभागीय चौकशी करण्याच्या शिफारसीच्या अनुषंगाने राज्य सरकारने श्रीमती संजीवनी कुट्टी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करून एक व्यक्तीची चौकशी समिती गठित केली. मी असे नमूद करतो की सदर चौकशी समितीने साक्ष नोंदवून आणि चौकशी समितीसमोर ठेवलेले दस्त विचारात घेऊन आपला अहवाल राज्य सरकारकडे सादर केला . श्रीमती संजीवनी कुट्टी यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत सदर प्रतिज्ञापत्रासोबत जोडलेली असून ती निशाणी "क" म्हणून दर्शविण्यात आली आहे.

७ मी असे नमूद करतो की याचिकाकर्त्याने मुद्दामहून संबंधित कागदपत्रे जसे की चौकशीची कागदपत्रे इत्यादी जोडलेली नाहीत आणि केवळ असंबंधित कागदपत्रे व याचिकाकर्त्यास लाभदायक अशीच कागदपत्रे जोडून या मेहरबान उच्च न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. मी असे नमूद करतो की याचिकाकर्त्याने या याचिकेसोबत काही गोपनीय कागदपत्रे जोडली आहेत ज्यांचा ताबा ठेवण्याचा याचिकाकर्त्याला कोणताही अधिकार नाही. मी असेही नमूद करतो की याचिकाकर्त्याने अनधिकृतपणे गोपनीय दस्तांच्या प्रती मिळवल्या हे तथ्य याचिकाकर्त्याने न्यायनिवाड्याच्या प्रक्रियेत केलेल्या हस्तक्षेपाचे स्पष्ट निदर्शक आहे.

मी त्यामुळे असे नमूद करतो की सदर प्रकरणातील तथ्यांच्या पार्श्वभूमीवर, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारांचा वापर करून या मेहरबान उच्च न्यायालयाने कोणताही हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही आणि त्यामुळे ही याचिका मोठ्या खर्चासह फेटाळण्यात यावी.

७ उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या वतीने दिनांक ९ एप्रिल २०१२ रोजी उत्तर प्रतिज्ञापत्र श्री. रविंद्र गावित, मंडळाचे अध्यक्ष - उत्तरवादी क्र. ३ यांनी दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रात उत्तरवादी क्र. ३ – मंडळाने स्पष्टपणे नमूद केले आहे की याचिकाकर्ता हा मंडळाचा कर्मचारी होता आणि त्याच्या नियुक्तीच्या वेळी केवळ मंजुरी देण्याव्यतिरिक्त उत्तरवादी क्र. १ यांची कोणतीही भूमिका नव्हती. सदर प्रतिज्ञापत्रात असेही नमूद करण्यात आले आहे की कल्याण आयुक्ताच्या नावास उत्तरवादी क्र. १ यांनी मंजुरी देणे याव्यतिरिक्त कल्याण आयुक्तांच्या नियुक्ती, कल्याण आयुक्तांच्या सेवेच्या अटी आणि शर्ती आणि वेतनाचे देयक यासंबंधीचे इतर सर्व निर्णय मंडळाद्वारे म्हणजेच उत्तरवादी क्र. ३- मंडळाद्वारे घेतले जातात. याशिवाय, अधिनियमाच्या कलम ४(६)(ड) चा उल्लेखही करण्यात आला आहे, ज्याद्वारे मंडळाला कल्याण आयुक्ताच्या सेवा अटी व शर्ती निश्चित करण्याचा अधिकार दिला आहे. सदर तरतूद पुढीलप्रमाणे आहे:-

"४. मंडळ.— (१) [राज्य सरकारने अधिसूचनेद्वारे राजपत्रात प्रसिद्ध करून, संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी निधीचे प्रशासन करण्याच्या उद्देशाने तसेच या अधिनियमांतर्गत मंडळास सोपविण्यात आलेल्या इतर

कार्यांसाठी मंडळ स्थापन करावे.] मंडळात १० [खाली नमूद केलेले सदस्य असतील, ज्यांची संख्या २६ पेक्षा जास्त नसेल], म्हणजेच:—

[(६) या कलमात काहीही असले तरी, महाराष्ट्र राज्यासाठी उपकलम (१) च्या तरतुदीनुसार मंडळ विधिपूर्वक स्थापन होईपर्यंत, बॉम्बे लेबर वेल्फेअर फंड (विस्तार व दुरुस्ती) अधिनियम, १९६१ (मह. अधिनियम क्र. XXXVI ऑफ १९६१) लागू होण्यापूर्वी लगेचचे कार्यरत असलेले मंडळ त्या क्षेत्रात कार्यरत राहील आणि त्या क्षेत्रासाठी या अधिनियमाच्या उद्देशाने मंडळ म्हणून कार्य करेल; आणि जेव्हा महाराष्ट्र राज्यासाठी संपूर्ण मंडळ उपकलम (१) नुसार स्थापन केले जाईल—

(ड) विद्यमान मंडळातील कल्याण आयुक्त तसेच इतर अधिकारी व कर्मचारी हेच नव्याने स्थापन केलेल्या मंडळाचे कल्याण आयुक्त तसेच अधिकारी व कर्मचारी राहतील; परंतु कल्याण आयुक्त व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा अटी व शर्ती या सक्षम प्राधिकरणाकडून विधिपूर्वक बदलल्या जाईपर्यंत, नव्याने स्थापन झालेल्या मंडळाखाली विद्यमान मंडळाच्या सेवेत असताना लागू असलेल्या सेवा अटी व शर्तींपेक्षा कमी सहाय्यक असणार नाहीत.]”

८. सदर प्रतिज्ञापत्रात असेही नमूद करण्यात आले आहे की याचिकाकर्त्याचे वेतन हे उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या निधीमधून अदा केले जाते, त्यामुळे याचिकाकर्ता हा मंडळाचा कर्मचारी असल्याचे स्पष्ट होते. अधिनियम व नियमांच्या संयुक्त वाचनानुसार उत्तरवादी क्र. ३ – मंडळाला याचिकाकर्त्याच्या सेवेसंबंधी सर्व निर्णय घेण्याचा, ज्यात सेवेतून बडतर्फी किंवा पदच्युती करण्याचाही अधिकार आहे. त्यामुळे उत्तरवादी क्र. १ यांनी वादग्रस्त आदेशाद्वारे याचिकाकर्त्याला उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्याचा घेतलेला निर्णय हा कायदेशीर अधिकाराविना घेतलेला आहे. सदर प्रतिज्ञापत्रात पुढे असेही नमूद केले आहे की याचिकाकर्त्याची सेवेतून बडतर्फी ही मूळतः ‘एक्स’ यांनी २००२ साली केलेल्या तक्रारीच्या आधारे सुरू करण्यात आलेल्या कथित लैंगिक छळाच्या प्रकरणातील चौकशीवर आधारित होती. ही तक्रार चौकशी अहवालात तथ्यहीन आढळली असून ‘एक्स’ यांनी स्वतः सर्व आरोप तसेच याचिकाकर्त्याविरुद्ध दाखल केलेले फौजदारी खटले मागे घेतले आहेत.

## विश्लेषण

९ आम्ही दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले आहे, तसेच आम्ही या प्रकरणाशी संबंधित नोंदी आणि या प्रकरणातील तथ्यांना लागू असलेल्या कायद्याच्या संबंधित तरतुदींचेही अवलोकन केले आहे. त्यानुसार, आम्ही सध्याच्या कार्यवाहीत विचाराधीन झालेल्या मूलभूत मुद्द्यावर निर्णय घेण्यास पुढे जात आहोत, तो म्हणजे - उत्तरवादी क्र. १ यांना अधिनियमाच्या कलम १५ च्या तरतुदींनुसार याचिकाकर्त्यास उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्याचे अधिकारक्षेत्र होते का . हा मुद्दा निकाली काढण्यासाठी, अधिनियमातील कलम १५ ची तरतूद पुनरुत्पादित करणे उपयुक्त ठरेल, जी पुढीलप्रमाणे आहे :-

> “१५. मंडळाच्या कर्मचारीवर्गातील कोणतीही व्यक्तीस काढण्याचा राज्य सरकारचा अधिकार.— राज्य सरकारला मंडळाच्या सेवेतून कोणत्याही अयोग्य ठरविलेल्या व्यक्तीस काढण्याचा आणि ज्यांच्या नियुक्तीबाबत मंडळाच्या एक-तृतीयांशाहून अधिक सदस्यांनी मंजुरी दिली नसेल अशा व्यक्तीच्या संदर्भात नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य शासनाला असेल.”

(भर दिला)

१० वरील कलमाचे साधे वाचन केल्यास हे स्पष्ट होते की कलम १५ राज्य सरकाराला असा अधिकार प्रदान करते की मंडळाच्या सेवेत नियुक्तीस अयोग्य ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीस, विशेष परिस्थितीत, जर राज्य सरकारला असे वाटले की संबंधित व्यक्ती “अयोग्य” आहे, तर राज्य सरकारला त्या व्यक्तीस अधिनियमाच्या कलम १५ अंतर्गत अधिकार वापरून सेवेतून काढण्याचा अधिकार आहे. हा अधिकार कलम १५ च्या

दुसऱ्या भागात नमूद केलेल्या अधिकारासोबत संलग्न आहे, ज्यामध्ये असे नमूद आहे की मंडळातील एकतृतीयांशापेक्षा अधिक सदस्यांनी सहमती न दर्शविलेल्या व्यक्तीची नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. मंडळावर कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती किंवा नोकरी देण्याचा अधिकार हा पूर्णपणे मंडळाचाच अधिकार आहे, जो अधिनियमाच्या कलम १५ अंतर्गत प्रदान करण्यात आला आहे. अशाप्रकारे, कलम १५ मधील "आणि" हा शब्द संलग्न वाचनात घ्यावा लागतो, कारण कलम १५ चा पहिला भाग राज्य सरकारला मंडळाच्या सेवेतून कोणतीही अयोग्य ठरविलेली व्यक्ती दूर करण्याचा अधिकार देतो आणि त्याचवेळी त्यास त्या व्यक्तीच्या जागी "नियुक्ती करण्याचा" अधिकारही प्रदान करतो, ज्यासंबंधी मंडळातील एकतृतीयांशाहून अधिक सदस्यांनी सहमती दर्शविलेली नसते. त्यामुळे, याच तर्कानुसार, सध्याच्या प्रकरणातील तथ्यांच्या पार्श्वभूमीवर हे स्पष्ट होते की याचिकाकर्ता हा उत्तरवादी क्र. ३ – मंडळाचा कर्मचारी आहे, कारण त्याची नियुक्ती उत्तरवादी क्र. ३ – मंडळाने केली आहे, उत्तरवादी क्र. १ यांनी नाही. पुढे, कल्याण आयुक्ताची नियुक्ती करण्याचा अधिकार हा उत्तरवादी क्र. ३ – मंडळाकडेच निहित आहे. अधिनियमाचे कलम ११ खालीलप्रमाणे पुनरुत्पादित केले आहे, ज्यामुळे हे स्पष्ट होते:-

"११. (१) (i) कल्याण आयुक्तांची नियुक्ती मंडळाद्वारे राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने केली जाईल;

(ii) कल्याण आयुक्त हे मंडळाचे प्रमुख कार्यकारी अधिकारी असतील;

(iii) कल्याण आयुक्ताचे कर्तव्य असेल की या अधिनियमाच्या आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींची योग्य अंमलबजावणी सुनिश्चित करणे आणि या उद्देशासाठी त्यास या

अधिनियमाच्या किंवा त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसलेले आदेश जारी करण्याचा अधिकार असेल, ज्यामध्ये मंडळाने या अधिनियमांतर्गत किंवा त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांनुसार घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासंबंधी कोणतेही आदेश समाविष्ट असतील."

११ एखाद्या उमेदवारास अयोग्य ठरविण्याचा अधिकार हा सेवेतून बडतर्फ करण्याच्या अधिकाराशी समान मानला जाऊ शकत नाही. कलम १५ ही अशी तरतूद नाही की ती अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदींना अधिभावी होईल, कारण कलम ११ मध्ये मंडळास आपल्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा स्वतंत्र व विशेष अधिकार प्रदान करण्यात आला आहे. हा एक स्थापित कायदा सिद्धांत आहे की "नियुक्ती करण्याचा अधिकार" यामध्ये "सेवेतून बडतर्फ करणे किंवा पदच्युत करणे" याचाही अधिकार अंतर्भूत असतो. (पाहा: जनरल क्लॉजेस ॲक्टचे कलम १६). याशिवाय, हे देखील स्पष्ट आहे की कलम १५ ची सुरुवात "नॉन ऑब्स्टेन्ट क्लॉज" ने होत नाही, जे कलम ११ च्या तरतुदींना, म्हणजेच मंडळास आपल्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा स्वतंत्र अधिकार देणाऱ्या तरतुदींना, अधिभावी होईल. त्यामुळे कलम १५ ला असा अर्थ देणे की त्यामध्ये मंडळाच्या कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याचा अधिकार समाविष्ट आहे, हे कलम १५ मध्ये प्रत्यक्षात नसलेली बाब त्यात वाचण्यासारखे ठरेल. प्रत्यक्षात असे करणे म्हणजे त्या तरतुदीच्या साध्या अवलोकनावर आणि उद्देशावर अन्याय करणे होईल.

११.१ कलम १५ द्वारे व्यक्त केलेल्या खऱ्या हेतूचा, अर्थाचा आणि परिणामांचा विचार केल्यास हे दिसून येते की या तरतुदीचा मुख्य उद्देश राज्य सरकारला असा अधिकार

प्रदान करणे आहे की ते मंडळाच्या सेवेतून कोणतीही व्यक्ती, जी "अयोग्य" असल्याचे त्यांना वाटते, "काढून" टाकू शकेल आणि त्याचबरोबर अशा व्यक्तीची नियुक्ती करू शकेल, ज्याच्या संदर्भात मंडळातील एकतृतीयांशाहून अधिक सदस्यांनी सहमती दर्शविलेली नाही. या तरतुदीत "अयोग्य" (unsuitable) हा शब्द वापरला गेल्याने प्रथम त्याच्या आशय आणि अर्थाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. 'Suitable' या शब्दाचा अर्थ विविध शब्दकोशांमधून पुढीलप्रमाणे स्पष्ट होतो –

> ब्लॅक्स लॉ डिक्शनरी[1] –
> 'suitable': उद्दिष्टित हेतूसाठी योग्य व अनुकूल (fit and appropriate for their intended purpose).
>
> ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी[2] –
> 'suitable': विशिष्ट व्यक्ती, उद्देश किंवा परिस्थितीसाठी योग्य किंवा अनुकूल (right or appropriate for a particular person, purpose, or situation).
>
> मेरियम-वेबस्टर. कॉम डिक्शनरी –
> 'suitable': (c) सक्षम, पात्र; उदाहरणार्थ – नोकरीसाठी योग्य उमेदवार (able, qualified: a suitable candidate for the job).

११.२ सर्वोच्च न्यायालयाच्या परवेज कादिर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया [3] या प्रकरणातील निर्णयाचा उपयुक्त संदर्भ येथे देता येईल, ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे ठरविले की 'suitable' (योग्य) या शब्दाची व्याख्या देण्याची आवश्यकता नाही, कारण अनुभवी असलेली कोणतीही व्यक्ती, कोण योग्य आहे हे जाणते. तथापि, प्रत्येक प्रकरणात "suitability" किंवा "suitable" या शब्दांचा वापर कोणत्या संदर्भात केला आहे, अधिनियमाचा उद्देश आणि साध्य करावयाचे ध्येय काय आहे, यानुसार त्याचा

[1] आठवी आवृत्ती, पृष्ठ १४७६
[2] अकरावी आवृत्ती, पृष्ठ १४४२
[3] एआयआर १९७५ एससी ४४६

अर्थ ठरविला पाहिजे, असेही न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने पुढे असेही ठरविले की “suitability” हा शब्द निवृत्तीच्या उद्देशाशी संबंधित आहे — म्हणजे एखाद्या व्यक्तीला उच्च सेवेतील नियुक्तीसाठी योग्य मानले जाते, आणि त्या निर्णयाचा पाया म्हणजे त्याची सेवाकालीन गुणवत्ता. जर ‘suitable’ या शब्दाचा अर्थ असा असेल, तर “unsuitability” (अयोग्यता) या कारणावरून पदावरून काढून टाकणे म्हणजे शिस्तभंगाच्या चौकशीतून करण्यात आलेली पदच्युती असे वाचण्याची आम्हाला भीती वाटते. यावरून स्पष्ट होते की “unsuitable” (अयोग्य) या शब्दाचा अर्थ कोणत्याही प्रकारे सेवेतून बडतर्फी (termination) असा घेतला जाऊ शकत नाही. उमेदवार अयोग्य आहे याचा अर्थ असा होत नाही की तो बडतर्फीच्या शिस्तभंग चौकशीच्या संदर्भात अयोग्य आढळला आहे. जर विधिमंडळाचा हेतू असा असता की सेवेतून बडतर्फीचा अधिकार राज्याला द्यायचा, तर त्या तरतुदीत तो उद्देश स्पष्ट शब्दांत समाविष्ट केला गेला असता[4]. म्हणूनच ही तरतूद जशी आहे तशीच वाचली पाहिजे, आणि तिच्या अर्थ, उद्देश किंवा ध्येयामध्ये बदल घडवू शकणारे कोणतेही शब्द त्यात जोडले किंवा बदलले जाऊ नयेत. वलसला कुमारी देवी एम. विरुद्ध डायरेक्टर, हायर सेकंडरी एज्युकेशन आणि इतर[5] या दुसऱ्या निर्णयात “suitability” या शब्दाचा अर्थ असा सांगितला आहे की नियुक्तीस पात्र व्यक्ती कायदेशीरदृष्ट्या पात्र असावी , आणि

[4] एक्स्प्रेसिओ युनियस एस्ट एक्स्क्लुसिओ अल्टरिअस (Expressio unius est exclusio alterius)

[5] (२००७) ८ एससी ५३३

"eligible" (पात्र) हा शब्द "निवड होण्यास पात्र" ("fit to be chosen") असा अर्थ घेऊन वाचला जावा.

१२. आम्ही देखील या मताचे आहोत की वादग्रस्त आदेशात याचिकाकर्त्याच्या अयोग्यतेबाबत अशी कोणतीही निष्कर्षात्मक नोंद नाही ज्यामुळे त्याला सेवेतून दूर करण्याचे औचित्य ठरते. एखाद्या उमेदवारास अयोग्य ठरविण्याचा अधिकार हा सेवेतून बडतर्फ करण्याचा अधिकार नाही. प्रत्यक्षात वादग्रस्त आदेश हा केवळ सदर 'एक्स' यांच्या तक्रारीवर आधारित पारित करण्यात आला आहे आणि त्या तक्रारीच्या आधारेच याचिकाकर्त्याची सेवा समाप्त करण्यात आली आहे. वादग्रस्त आदेशातील संबंधित निष्कर्ष खालीलप्रमाणे पुनरुत्पादित करण्यात येत आहेत (इंग्रजी भाषांतर):-

> "७. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त श्री . मोहन धोत्रे जाब देणार या अधिकाऱ्याविरुद्ध सध्याची विभागीय चौकशीची कारवाई नियमांनुसार सुरू करण्यात आली आहे. त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे दोषी अधिकाऱ्यास उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यांना शासन साक्षीदारांची उलट तपासणी करण्याची संधी देण्यात आली असून त्यांच्या वतीने नमूद करण्यात आलेल्या साक्षीदारांनाही साक्ष नोंदविण्यासाठी बोलावण्यात आले. त्यामुळे दोषी अधिकाऱ्याचा हा दावा की ही चौकशी कायद्यानुसार नाही, स्वीकारता येणार नाही. आपल्या अहवालाच्या परिच्छेद क्र. ११ आणि १२ मध्ये, चौकशी अधिकाऱ्याने श्रीमती प्रज्ञा म्हात्रे यांनी त्यांच्या लैंगिक छळाची सदर तक्रार परत घेण्यामागील दबावाच्या तंत्राचे तपशीलवार विश्लेषण केले आहे.
>
> ८. जाब देणार अधिकारी श्री. धोत्रे यांना दोन वर्षांसाठी त्यांच्या दोन वेतनवाढीचे हप्ते का थांबवू नयेत याबाबत कारणे दाखवा नोटीस देणारे शासन पत्र मागे घेतले जाते.
>
> ९ महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त हे मंडळाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी आहेत आणि मंडळाचे सर्व आर्थिक व प्रशासकीय अधिकार त्यांच्याकडे निहित आहेत . सदर प्रकरणात, श्री. मोहन धोत्रे यांनी या व्यापक अधिकारांचा गैरफायदा घेतला आहे. चौकशी अधिकाऱ्याने आपल्या चौकशी अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे की, कल्याण आयुक्त म्हणून तसेच कार्यालय प्रमुख या नात्याने, कार्यालयात कार्यरत महिलांसाठी सुरक्षित आणि योग्य वातावरण राखण्याची जबाबदारी ही केवळ जाब देणाऱ्या अधिकाऱ्यावरच होती. तथापि, असे असूनही,

त्यांनीच सदर कृत्ये केली आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. या पार्श्वभूमीवर, सौ. प्रज्ञा म्हात्रे, त्यावेळच्या कनिष्ठ लिपिक, यांच्याशी लैंगिक छळ करणे, सौ. म्हात्रे यांना साथ देणाऱ्या किंवा त्यांना सहकार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांची द्वेषाने किंवा सूडभावनेने दुर्गम ठिकाणी बदली करणे, कोणतेही कारण नसताना त्यांना निलंबित करणे, त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशा सुरू करणे आणि कल्याण आयुक्त या पदाचा गैरवापर करणे — ही सहा आरोपपत्रातील कृत्ये शासन सेवकास शोभणारी नसून, ती जाब देणार अधिकारी श्री. मोहन जे. धोत्रे, कल्याण आयुक्त, यांच्या विरोधात सिद्ध झाली आहेत. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिसेस (डिसिप्लीन अँड अपील) नियम, १९७९ मधील नियम ५(९) आणि बॉम्बे लेबर वेल्फेअर फंड ॲक्ट, १९५३ मधील कलम १५ च्या तरतुदींनुसार शासनाकडे निहित असलेल्या अधिकारांचा वापर करून, श्री. मोहन जे. धोत्रे, कल्याण आयुक्तांना, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्यात येत आहे.

१० श्री. मोहन धोत्रे, कल्याण आयुक्त यांनी या विभागीय चौकशीच्या संदर्भात मेहरबान मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ७५६२/२००३ मध्ये मेहरबान मुंबई उच्च न्यायालयाने पारित केलेल्या दिनांक २३/०२/२००४ च्या निर्णयानुसार, उपरोक्त आदेश जारी केल्याच्या तारखेपासून चार आठवड्यांच्या कालावधीपर्यंत सदर आदेशाची अंमलबजावणी केली जाणार नाही. त्याचप्रमाणे, जाब देणार अधिकारी श्री. मोहन जे. धोत्रे यांना या शासन निर्णयाविरुद्ध दिलासा मिळविण्यासाठी योग्य प्राधिकरणाकडे जाण्याचे पूर्ण स्वातंत्र्य राहील.

१३. या निष्कर्षांवरून स्पष्ट होते की याचिकाकर्त्याला सेवेतून बडतर्फ करण्यासाठी केवळ "नैतिक अध:पतन" हेच एकमेव कारण म्हणून वापरण्यात आले आहे. आमच्या मते, वादग्रस्त आदेश पारित करताना उत्तरवादी क्र. १ यांनी अवलंबलेला हा दृष्टिकोन अयोग्य आहे, कारण कलम १५ मध्ये अशा प्रकारे कोणत्याही कर्मचाऱ्याला नैतिक अध:पतनाच्या कारणावरून सेवेतून बडतर्फ करण्याची तरतूद नाही. वादग्रस्त आदेशात हे महत्त्वाचे तथ्यदेखील विचारात घेतले नाही की तक्रारदार 'एक्स' हिने स्वतःच तीन वेळा याचिकाकर्त्याविरुद्ध केलेले आरोप मागे घेतले होते. प्रत्यक्षात, 'एक्स' हिने दिनांक १७ जानेवारी २००४ रोजी प्रधान सचिव यांच्यासमोर सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्ट नमूद केले होते की ती निधी निरीक्षक या उच्च पदावरील पदोन्नतीसाठी निवडली गेली नसल्यामुळे ती मानसिकदृष्ट्या खचली होती आणि याचिकाकर्ताच तिच्या पदोन्नती न

होण्यास जबाबदार आहे, या गैरसमजुतीखाली तिने याचिकाकर्त्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. त्या प्रतिज्ञापत्रात तिने हेही नमूद केले होते की तिला आपली चूक लक्षात आली असून तिने याचिकाकर्त्याविरुद्ध केलेले सर्व आरोप मागे घेतले आहेत.

१४ पुढे, दिनांक १० जानेवारी २००४ रोजी अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी , भोईवाडा यांनी, 'एक्स' यांनी याचिकाकर्त्याविरुद्ध दाखल केलेल्या फौजदारी खटला क्र. ६१/पी/०३ मध्ये याचिकाकर्त्याची निर्दोष मुक्तता करणारा आदेशही पारित केला आहे. तसेच, पुरावा नोंदीवरून (निशाणी–ओ, पृष्ठ क्र. १०२ ते १०४ याचिकेतील) असेही दिसून येते की चौकशी अधिकाऱ्यासमोर दिलेल्या साक्षीमध्ये 'एक्स' हिने स्पष्टपणे नमूद केले आहे की काही सहकर्मचाऱ्यांच्या प्रोत्साहनाने तिने याचिकाकर्त्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. पुरावा नोंदीतील संबंधित नोंदी खाली पुनरुत्पादित करण्यात येत आहेत (इंग्रजी भाषांतर) :

> "प्रश्न : तुम्ही या तक्रारी का केल्या?
>
> उत्तर : सर्वप्रथम या प्रकरणाचे संक्षिप्त तथ्य सांगणे आवश्यक आहे. या घटनेच्या दोन वर्षे आधी, आमच्या पदोन्नतीसाठी लेखी परीक्षा व तोंडी मुलाखत कार्यालयात घेण्यात आली होती. माझ्या असे ऐकिवात आले होते की मी लेखी परीक्षेत प्रथम क्रमांकावर आले आहे. मलाही याबाबतीत आत्मविश्वास होता कारण मी लेखी आणि तोंडी दोन्ही परीक्षांमध्ये चांगले काम केले होते. याच काळात श्री. धोत्रे यांनी मला बोलावले आणि विचारले की, तुला पदोन्नती मिळाली तर पगार किती वाढेल? त्यांनी मला सांगितले की, माझे गुण चांगले आहेत. मात्र त्यानंतर काय झाले हे मला माहीत नाही, कारण पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांच्या यादीत माझे नाव नव्हते. पदोन्नती मिळालेल्यांपैकी श्री. बी. व्ही. शिंदे यांना पदोन्नती देण्यात आली होती, ज्यांच्याविरुद्ध निधीचा गैरव्यवहार केल्याचे आरोप होते, आणि हे पाहून मला आश्चर्य वाटले की अशा व्यक्तीस पदोन्नती कशी दिली गेली. असे सांगितले गेले की पदोन्नतीसाठी पैशांचे देणेघेणे झाले आहे. श्री. जगदीश नाईक यांनी सांगितले की माझे नाव वगळण्यास श्री. धोत्रे जबाबदार आहेत. मला ही गोष्ट फारच वाईट वाटली, परंतु मी दोन वर्षे काहीही बोलले नाही. त्यानंतर, सुमारे ऑक्टोबर २००२ मध्ये मला समजले की पदोन्नतीच्या

माध्यमातून पुन्हा एकदा ती जागा भरली जाणार आहे. मला वाटले की माझ्यावर अन्याय होऊ नये म्हणून पुन्हा प्रयत्न करावा, आणि म्हणूनच मी पदोन्नतीच्या प्रश्नासंदर्भात मेहरबान उपमुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार केली.

यानंतर, श्री. धोत्रे यांनी मला विचारले की तू मेहरबान उपमुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार का केलीस? इतकेच नव्हे तर मंडळाच्या अध्यक्षांनीदेखील याबाबत माझ्याकडे स्पष्टीकरण मागितले. मंडळाचे अध्यक्ष म्हणाले की या सर्व पदोन्नती त्यांच्या आदेशाने देण्यात आल्या आहेत आणि श्री. धोत्रे यांचा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही.

यानंतर, दिनांक २१ नोव्हेंबर २००२ रोजी, मी नेहमीप्रमाणे संगणकावर काम करत असताना, श्री. धोत्रे आले आणि त्यांनी मला विचारले की मी तिथे का बसले आहे. मी नेहमी या संगणकावर बसत असे आणि सहाय्यक कल्याण आयुक्त श्री. इंगळे यांच्या परवानगीनेच बसत असे. हा संगणक वेगाने चालत असल्याने मी त्यावर काम करत होते. त्यानंतर माझ्या उपस्थितीतच श्री. धोत्रे यांनी श्री. चौधरी यांना सांगितले की त्यांच्या स्वतःच्या पुढच्या खोलीतील संगणक वेगाने चालतो आणि त्यांनी मला तिथे बसण्यास सांगावे. हे ऐकून मला अपमानास्पद वाटले आणि स्त्रीबद्दल अशा प्रकारे बोलणे अनुचित होते. त्या वेळी, मी खूप नाराज झाले आणि त्वरित कार्यालयातून बाहेर पडून माझ्या पतीकडे गेले. त्याचप्रमाणे, मी त्या वेळी कर्मचारी संघटनेचे श्री. जगदीश नाईक यांना भेटण्याचा प्रयत्न केला, परंतु ते कार्यालयात नसल्याने मी रजेचा अर्ज देऊन कार्यालयातून निघाले. त्यानंतर मी श्री. जगदीश नाईक यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला आणि एल्फिन्स्टन स्टेशन येथे त्यांना भेटायला गेले. श्री. जगदीश नाईक यांच्याशी चर्चा केल्यानंतर, मला माटुंगा पोलिस ठाण्यात नेण्यात आले. संघटनेचे पदाधिकारी श्री. हलदंकर, श्री. जगदीश नाईक, श्री. काळे यांनी मला सांगितले की यापूर्वीही श्री. धोत्रे यांनी नागपूर आणि औरंगाबाद येथील कार्यालयांमध्ये महिलांचा याच प्रकारे छळ केला होता आणि त्यामुळे माझ्या तक्रारीच्या आधारे त्या महिलांनाही न्याय मिळेल. पदोन्नतीच्या प्रकरणामुळे मी आधीच निराश झाले होते, तसेच श्री. धोत्रे यांना हे आवडले नव्हते की मी मेहरबान उपमुख्यमंत्री यांच्याकडे त्या बाबत तक्रार केली होती. पुढे, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार, माझ्याबद्दल केलेल्या अनुचित टिप्पणींविषयी, म्हणजेच २१ नोव्हेंबर रोजी पुढच्या खोलीत बसविण्याबाबत मी तक्रार दाखल केली. या लोकांनी मला विविध ठिकाणी नेले आणि माझ्या तक्रारीसंबंधी विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांना व पदाधिकाऱ्यांना भेटवले. माझे वडीलदेखील संघटनेचे अध्यक्ष होते आणि बालपणापासूनच मी या सर्व संघटनेतील लोकांना ओळखत असल्यामुळे मी त्यांच्यासाठी मुलीसारखी होते. पुढे, तत्कालीन उपकल्याण आयुक्त श्री. परांडेकर हेही दोन वेळा माझ्या घरी आले आणि त्यांनी मला तक्रार दाखल करण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या आणि इतरांच्या सल्ल्यानुसार, मी विविध कार्यालयांमध्ये तक्रार अर्ज दाखल केले.

मी पुन्हा नमूद करू इच्छिते की, कल्याण आयुक्तांच्या कार्यालयातील पदोन्नती या प्रकरणाचा केंद्रबिंदू बनल्या आहेत. या पदोन्नती पूर्णपणे चुकीच्या पद्धतीने करण्यात आल्या असून चुकीच्या लोकांना पदोन्नती देण्यात आली. या पदोन्नती देताना शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. अशा मंजुरीशिवाय या पदोन्नती देण्यात आल्या असल्याने त्या बेकायदेशीर ठरतात.

प्रश्न: तुम्ही तक्रारीवर स्वाक्षरी करताना तुमची विवेकबुद्धी का वापरली नाहीत?
उत्तर: मला असे वाटले की बऱ्याच महिला असतील ज्यांना श्री. धोत्रे यांच्या हातून छळ सहन करावा

लागला असेल, पण त्या पुढे येऊ शकल्या नाहीत. त्यामुळे मी पुढाकार घेत आहे आणि एक चांगले कार्य करत आहे, असे मला वाटले. मात्र आता मला जाणवते की संघटनेने माझा वापर करून घेतला.

प्रश्न: तुम्ही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांवर का विश्वास ठेवला आणि ऐकीव माहितीनुसार तक्रार का दाखल केली?
उत्तर: हे सर्व पदाधिकारी माझ्या वडिलांचे मित्र होते आणि बालपणापासूनच मी त्यांना ओळखत होते. ते माझे हितचिंतक आहेत आणि माझ्यासाठी ते वडिलांसारखे आहेत, म्हणूनच मी त्यांच्यावर विश्वास ठेवला. तसेच, इतर महिलांविषयीची माहिती ही ऐकीव असली तरी, मला पुढच्या खोलीत बसविण्याबद्दल जे शब्द उच्चारले गेले ते प्रत्यक्ष माझ्याबाबत होते, ते मला अत्यंत दुखावणारे वाटले आणि निःसंशयपणे स्त्रीच्या दृष्टीने अपमानास्पद होते.

प्रश्न: तुम्ही नंतर तुमची तक्रार का मागे घेतली?
उत्तर: माझ्या तक्रारीच्या आधारे श्री. धोत्रे यांना निलंबित करण्यात आले आणि हे प्रकरण न्यायालयापर्यंत गेले, याची मला कल्पना नव्हती की इतके मोठे होईल. त्यानंतरसुद्धा मला पदोन्नती मिळाली नाही. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मला समजावले की हे प्रकरण प्रलंबित असताना मला पदोन्नती देणे योग्य ठरणार नाही. श्री. धोत्रे यांच्या निलंबनानंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी माझ्याशी बोलणे बंद केले आणि मी पूर्णपणे एकटी पडले. मला समजले की माझ्या प्रकरणासाठी संघटनेने सुमारे हजार कर्मचाऱ्यांकडून प्रत्येकी ₹१,०००/- ते ₹१,५००/- इतके योगदान गोळा केले होते. मात्र नंतर मला सांगण्यात आले की हे प्रकरण वैयक्तिक आहे आणि ते मला स्वतःच्या खर्चाने लढावे लागेल.

तक्रारीनंतर, धोत्रे साहेबांनी माझी त्या कार्यालयातून बदली केली. पुढे, एका वर्षापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या अर्ध्या वेतनाच्या प्रसूती रजेबाबत कोणतेही कारण नसताना पुन्हा चौकशी करण्यात आली. या सर्व गोष्टींमुळे मी फार त्रस्त झाले. सगळे लोक माझ्याशी याच विषयावर बोलत होते आणि मी या गोष्टींनी कंटाळले होते. त्यानंतर श्री. परांडेकर यांनी पुन्हा माझी बदली मुख्य कार्यालयात केली. या सगळ्या प्रकारामुळे मला असे वाटू लागले की मी जणू एक खेळणे झाले आहे. आजही या मानसिक तणावामुळे माझी तब्येत ठीक नाही आणि मी औषध घेत आहे. नंतर मला हेही समजले की या प्रकरणामुळे लोक माझ्याविषयी खोट्या आणि दूषित अफवा पसरवत आहेत आणि त्याचा परिणाम म्हणून माझी प्रतिष्ठा कमी झाली आहे, जे माझ्यासाठी असह्य आहे. या सर्व कारणांमुळे मी माझी तक्रार मागे घेतली.

१५ त्यामुळे हे स्पष्टपणे दिसून येते की वादग्रस्त आदेशामध्ये हे अत्यंत महत्त्वाचे तथ्य पूर्णपणे दुर्लक्षित केले आहे की तक्रारदार 'एक्स' हिने याचिकाकर्त्याविरुद्ध केलेले आरोप मागे घेतले होते, आणि हाच तो आधार होता ज्यावर वादग्रस्त आदेश पारित करण्यात

आला होता. कारण जेव्हा तो आधार / आरोपच याचिकाकर्त्याविरुद्ध टिकत नाही, तेव्हा वादग्रस्त आदेश ज्या पायावर टिकून होता, तो पाया पूर्णतः नष्ट होतो.

१६ वादग्रस्त आदेश हा अधिकारक्षेत्राविना पारित करण्यात आलेला असल्यामुळे तो रद्द करण्यास पात्र आहे, कारण उत्तरवादी क्र. १ हा याचिकाकर्त्याचा नियोक्ता नव्हता, तर उत्तरवादी क्र. ३ – मंडळ हे याचिकाकर्त्याचे नियुक्ता होते. अधिनियमाच्या कलम ११ अंतर्गत याचिकाकर्त्याची नियुक्ती उत्तरवादी क्र. ३ – मंडळाने केली होती, आणि त्या नियुक्तीमध्ये उत्तरवादी क्र. १ यांची भूमिका केवळ पूर्वमंजुरी देण्यापुरती मर्यादित होती. ही मंजुरी उत्तरवादी क्र. १ यांनी १९९९ साली दिली होती. एकदा ही मंजुरी दिल्यानंतर उत्तरवादी क्र. १ यांची भूमिका समाप्त झाली आणि राज्यास याचिकाकर्त्याच्या सेवा अटींवर निर्णय घेण्याचा कोणताही अधिकार उरत नाही. प्रत्यक्षात, उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या मते, याचिकाकर्त्याचे वेतन हे उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या निधीतूनच अदा केले जाते आणि ते थेट त्या निधीतून खर्ची पडते. याशिवाय, कलम १५ चा अर्थ व मर्यादा अत्यंत स्पष्ट आहेत, ज्यामध्ये नमूद आहे की कोणत्या परिस्थितीत उत्तरवादी क्र. १ अशा प्रकारचा अधिकार वापरू शकतो, जसा वर उल्लेख केला आहे. सध्याच्या प्रकरणाच्या तथ्यांनुसार, उत्तरवादी क्र. ३ – मंडळाचे अध्यक्ष यांनी 'एक्स' यांनी केलेल्या आरोपांवर चौकशी केली आणि दिनांक २६ डिसेंबर २००२ रोजी त्याचा अहवाल उत्तरवादी क्र. १ यांना सादर केला. त्यामुळे 'एक्स' च्या तक्रारीवर कार्यवाही करण्यात

मंडळाकडून कोणतीही निष्क्रियता झाली नव्हती, आणि म्हणूनच उत्तरवादी क्र. १ यांना याचिकाकर्त्याला सेवेतून दूर करण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही.

१७ त्यामुळे आम्ही या निष्कर्षावर पोहोचलो आहोत की वादग्रस्त आदेश हा उत्तरवादी क्र. १ यांच्या अधिकारक्षेत्राविना आणि अधिकाराविना, अशा विषयांवर पारित करण्यात आला आहे जो पूर्णपणे उत्तरवादी क्र. ३ – मंडळाच्या विशेष कार्यक्षेत्रात येतो. उत्तरवादी क्र. ३ – मंडळ हे स्वतंत्र स्वायत्त संस्थान आहे, ज्यास शाश्वत उत्तराधिकार, सर्वसाधारण शिक्का आणि स्थावर तसेच जंगम संपत्ती संपादन करण्याचा अधिकार आहे. हे अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत स्थापन करण्यात आलेले स्वतंत्र संस्थान आहे. राज्य शासनास केवळ सर्वसाधारण देखरेखीचा आणि नियंत्रणाचा अधिकार आहे; ते अधिनियमात स्पष्टपणे प्रदान केलेल्या अधिकारांपलीकडे कोणतेही अधिकार वापरू शकत नाही. सद्य प्रकरणात अधिनियमाच्या कलम १५ अंतर्गत अधिकारांचा वापर करणे शक्य नव्हते. त्यामुळे वैधानिक तरतुदींच्या आधारे हे स्पष्ट होते की उत्तरवादी क्र. ३ – मंडळ हे पूर्णपणे स्वतंत्र संस्थान आहे, ज्याचे स्वतःचे नियम आणि नियमावली आहेत, जे त्याच्या कर्मचाऱ्यांच्या सेवा अटी आणि संस्थेचे सुचारू कार्य सुनिश्चित करण्यासाठी तयार केलेले आहेत. वादग्रस्त आदेशाने पुढे 'याचिकाकर्त्याची योग्यतता' ('suitability') या अत्यावश्यक बाबीवर कोणतीही चर्चा केलेली नाही, किंवा

त्यासंबंधी कोणताही निष्कर्ष नोंदविलेला नाही. याचिकाकर्त्याची नियुक्ती कल्याण आयुक्त या पदासाठी निश्चित केलेल्या सर्व पात्रता निकषांची पूर्तता केल्यानंतरच करण्यात आली होती. वादग्रस्त आदेशात कल्याण आयुक्त पदासाठी याचिकाकर्त्याच्या योग्यतेबाबत कोणतीही शंका व्यक्त करण्यात आलेली नाही, त्यामुळे कलम १५ अंतर्गत आवश्यक असलेल्या अत्यंत महत्त्वाच्या घटकाचा, म्हणजेच 'योग्यतेचा' ('suitability') विचार न करता आदेश पारित करण्यात आला आहे.

१८. राज्याने आपल्या अधिकारक्षेत्राचे उल्लंघन केल्याच्या संदर्भात, सर्वोच्च न्यायालयाने म्युनिसिपल बोर्ड कन्नौज विरुद्ध स्टेट ऑफ उत्तर प्रदेश आणि इतर[6] या प्रकरणात दिलेला खालील निर्णय पुनरुत्पादित करण्यात येत आहे. या निर्णयात, *उत्तर प्रदेश म्युनिसिपॅलिटीज ॲक्ट,* १९१६ च्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने असे ठरविले की, उप-कलम (१-बी) राज्य शासनाला (अंमलबजावणीला किंवा पुढील अंमलबजावणीला प्रतिबंध करण्याच्या) नावाखाली बडतर्फीचा आदेश रद्द करण्याचा किंवा समाप्त करण्याचा अधिकार देत नाही. मंडळाचा ठराव किंवा मंडळाने विधिपूर्वक अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचा आदेश हा या कलमान्वये रद्द अथवा रद्दबातल करण्यास पात्र नाही. या कलमांतर्गत करता येण्यासारखी गोष्ट एवढीच आहे की, अशा ठरावाची किंवा आदेशाची अंमलबजावणी किंवा पुढील अंमलबजावणी थांबविणे, किंवा अशा ठरावाच्या / आदेशाच्या अनुषंगाने कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कृतीस प्रतिबंध करणे.

---
[6] (१९७२ ३ एससी ३४५)

जर ठराव/आदेशाला मंडळाच्या किंवा त्याच्या अधिकाऱ्याच्या ठरावाच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीत किंवा पुढील अंमलबजावणीत कोणतीही कृत्य करण्याची किंवा पाऊल उचलण्याची आवश्यकता नसेल, तर प्रतिबंध करण्यासारखे काहीही नाही. जर या तरतुदीचा उद्देश राज्य शासनास मंडळाचा ठराव किंवा आदेश रद्द अथवा रद्दबातल करण्याचा अधिकार देण्याचा असता, तर ते साध्या शब्दांत स्पष्टपणे नमूद केले गेले असते आणि “अंमलबजावणी रोखणे किंवा पुढील अंमलबजावणी रोखणे” अशा गुंतागुंतीच्या शब्दप्रयोगाची आवश्यकता राहिली नसती. कलम ३४ चे उपकलम (१-ब), अगदी कलम ३४ च्या उपकलम (४) सोबत वाचले तरी, अशा कोणत्याही ठरावास / आदेशास लागू होत नाही जो पारित किंवा जारी झाल्यानंतर आपोआपच संपुष्टात येतो. वरील दृष्टीकोन स्वीकारत सर्वोच्च न्यायालयाने अपील मंजूर केले आणि राज्य सरकारचा दिनांक १२ मे १९६५ रोजीचा आदेश रद्दबातल केला.

१९. त्यामुळे आमच्या मतानुसार, वादग्रस्त आदेशामध्ये केवळ या प्रकरणातील अत्यंत महत्त्वाची तथ्ये विचारात घेण्यात अपयशच आले नाही, तर तो पूर्णपणे अधिकारक्षेत्राविना पारित करण्यात आला आहे, आणि म्हणूनच तो रद्दबातल व समाप्त करण्यास पात्र आहे. वरील चर्चेच्या परिणामस्वरूप, ही याचिका खालील आदेशाच्या अटींनुसार मंजूर करण्यात येत आहे:-

**आदेश**

(i) आम्ही उत्तरवादी क्र. २ यांनी दिनांक ३१ जानेवारी २०१२ रोजी पारित केलेला वादग्रस्त आदेश रद्दबातल व समाप्त करीत आहोत.

(ii) विनंती (अ) आणि (ब) नुसार न्यादेश पूर्णतः मंजूर करण्यात येतो.

(iii) पक्षकारांनी या आदेशाच्या प्रमाणित केलेल्या प्रतीवर कार्यवाही करावी.

(iv) आम्ही याचिका मंजूर केल्यामुळे, जर याचिकाकर्ता या आदेशामुळे काही अनुषंगिक लाभ प्राप्त होण्यास पात्रता असेल, तर याचिकाकर्त्यास त्या संदर्भात मंडळाकडे निवेदन करण्याचे स्वातंत्र्य राहील. मंडळाने त्याचा विचार करावा आणि कायद्यानुसार त्यावर योग्य निर्णय घ्यावा. असे निवेदन आजपासून चार आठवड्यांच्या आत सादर केले जावे आणि ते निवेदन याचिकाकर्त्याला ऐकल्यानंतर (hearing) चार आठवड्यांच्या आत निकाली काढले जावे. जर कोणतीही देय रक्कम देणे आवश्यक असेल, तर ती रक्कम अशा निर्णयानंतरच्या पुढील चार आठवड्यांच्या आत अदा करण्यात यावी.

**(न्यायमूर्ती आरती साठे)** **( न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी.)**

------------------------------

# अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x